Reg. No. /NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३५] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १-७, २०२२/भाद्रपद १०-१६, शके १९४४ [पृष्ठे ०९, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार—अ, चार-ब व चार—क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-२ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २-९ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१३८ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१४.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, dated 11th August, 2022.

*NOTIFICATION*

No. SPP.-2022-U.O.R. 63-D-XIV.----

In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of the Section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 (Act No. II of 1974), the Government of Maharashtra hereby appoints Adv,. Parikshit Ganorkar as “Special Public Prosecutor” for conducting the case’s before the Hon’ble Session Court, Achalpur, Distt. Amravati which is/are arising out of C. R. No. 211-2021 registered at Dharni Police Station, Amravati.

2. The fees of Adv. Parikshit Ganorkar as “Special Public Prosecutor” shall be paid by Home Department as per the fee schedule agreed by Home Department and approved by this department.

3. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

4. The Government reserves right to revoke/modify/annul the order without assigning any reasons.

By order and the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI P. BORUDE,
Section Officer,
Law & Judiciary Department.

---

# संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१५.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक विभूअ-बें.प्र.-कावि-३९६-२०२२.—

ज्याअर्थी, भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम-३ च्या खंड (ई) च्या पत्रकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (झेड-अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन-मध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची आवश्यकता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत (विस्थापित होत असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम-४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्य उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम-१९ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) बेंबळा प्रकल्प, यवतमाळ यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची—एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

अनिवार्य भूसंपादन प्रकरण क्रमांक ३-४७-२०२१-२२,
गाव कोसारा (अनिवार्य), तालुका मारेगाव, जिल्हा यवतमाळ.

| अ. क्र. | भूसंपादन किंवा भूखंड क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ६१ | ० ०८ |
| २ | १३९ | ० ०४ |
| ३ | १८७ पै. | ० ०७ |
| ४ | ६९/१ | ० ०५ |
| | एकूण क्षेत्र . . | ० २४ |

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :— बेंबळा प्रकल्प, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ

प्रकल्प कार्याचे वर्णन :— फा. अ., बेंबळा पाटबंधारे विभाग, यवतमाळ

समाजाला मिळणारे लाभ :— या प्रकल्पाद्वारे सिंचनाचा फायदा होणार असून लाभक्षेत्रातील संबंधित शेतक-याना सिंचनासाठी फायदा करून घेता येईल व त्यामुळे त्यांचे कृषी उत्पन्नात भर पडून जिवनमान उंचावणार आहे. तसेच भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.

**अनुसूची—तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

प्रस्तावित भूसंपादनामुळे बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत नाही.

**अनुसूची—चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश :— नविन भूसंपादन कायदा, २०१३ कलम ६ अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

**अनुसूची—पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम :— प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :— निरंक.

(क) ज्या अधिसूचनाद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील. :— निरंक.

**विशेष नोंद.—**उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), बेंबळा प्रकल्प, यवतमाळ यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

यवतमाळ :
दिनांक २० जुलै २०२२.

**अमोल येडगे,**
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१६.

## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), यांजकडून

### जाहीर नोटीस

क्रमांक उपजि-भूसं.र.प्र.-अ.का.-कावी-१२८०-२०२२.—

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांचे कार्यालयाअंतर्गत यवतमाळ-आर्णी रस्त्याला जोडणा-या म्हसोला जोडरस्त्याचे पोचमार्गाचे बांधकाम या प्रयोजनाकरीता मौजा म्हसोला, ता. जि. यवतमाळ येथील खालील अनुसूचीमध्ये दर्शविलेल्या गट नं. मधील खाजगी जमीन संबंधित भूधारक यांचेकडून थेट खरेदीने घेण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

### अनुसूची

भूसंपादन प्रकरण क्रमांक २९-४७-२०२१-२२, मौजा म्हसोला, ता. जि. यवतमाळ

| अ. क्र. | भूधारकाचे नाव | | गट नं. | एकूण क्षेत्र | एकूण आकार | संपादित क्षेत्र | भोग वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | हे. आर | हे. आर | हे. आर | |
| १ | मिनाबाई अशोकराव भुजाडे | . . | १०२/२ | १ ४६ | २ ७० | ० २५ | १ |
| २ | गणेश महादेव पत्रे | . . | १०४/२ | १ ६८ | २ ५० | ० ५० | १ |
| ३ | मोरेश्वर बद्री चव्हाण | . . | १०६ पै. | १ ३८ | १ ७६ | ० १३ | १ |
| ४ | वासुदेव डोमाजी चव्हाण,<br>माधुरी वासुदेव चव्हाण | . . | १०७ | ३ ८२ | ५ ०० | ० ३३ | १ |
| ५ | हितेश वासुदेव चव्हाण | . . | १०८ | १ ४२ | १ ८३ | ० ०३ | १ |
| ६ | मनोहर गोटूसिंग चव्हाण | . . | ११२ पै. | २ ०० | १ ८५ | ० २२ | १ |
| ७ | गोपालदास रतनलाल मुंधडा | . . | १११/३ | ७ ३४ | ५ ३५ | ० २६ | १ |
| ८ | राधिका गणेश राठोड | . . | ६७ पै. | ३ ४८ | ५ ८९ | ० १८ | १ |
| | | | | | एकूण . . | १ ९० | |

तरी उपरोक्त वर्णन केलेल्या मालमत्ताचे बाबतीत कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध गहाण, उजर, ताबा, वारसा, हक्क किंवा शासकीय, निमशासकीय, खाजगी वित्त संस्थेचा बोजा, इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध/आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस जाहीर झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ येथे अथवा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. सदरहू कालावधीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांचे कार्यालय कायद्यानुसार थेट खरेदीद्वारे जमीन संपादित करण्यास व पुढील कार्यवाही करण्यास मोकळे राहील व त्यानंतर कोणाचीही, कोणत्याही प्रकारची उजर/तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**सविता चौधर,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
रस्ते प्रकल्प, यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक २२ ऑगस्ट २०२२.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१७.

## उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उ.वि.अ. तथा भू. सं.-अ.का.-कावि-५७६-२०२२.—

ज्याअर्थी, भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम-३ मधील पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने, महसूल व वन विभाग अधिसूचना क्रमांक MIS-11-2014-C.R.-77-A-2, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा केला आहे) द्वारे भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे याला " सदरहू अधिसूचना " संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना (सदरहू कायद्याच्या कलम ३ मधील पोट-कलम (ए झेड) नुसार) जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांना या कायद्याअंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, या अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषीत करण्यात आले आहे. त्याअर्थी, अनुसूची–एक मध्ये दर्शविलेल्या जमिनी (यापुढे त्यांचा उल्लेख " उक्त भूमि " असा करण्यात येईल) अनुसूची–दोन मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी, वाशिम यांची समुचित शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदरहू कायद्याच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसूचीत करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर्हू भूमि संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची–तीन मध्ये नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी, भूमि संपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमि संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची–चार मध्ये नमूद केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, या भूमि संपादन कायद्याचे कलम ४३, पोट-कलम (१) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसूची–पाचमध्ये प्रशासकाचे विवरण नमूद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास, अनुसूची–पाच मध्ये माहिती देणे आवश्यक आहे) ;

त्याअर्थी, आता, सदर्हू कायद्याच्या कलम-११ चे पोट-कलम (४) नुसार अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सदर्हू भूमि कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या भूमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणीमधून अशा भूमी मालकास सूट देऊ शकेल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिका-याद्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदर्हू भूमी संपादन कायद्याचे कलम-११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त नियम " असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उप-नियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे कामी हाती घेतील.

आणि म्हणून, त्याअर्थी, समुचित शासन म्हणून जिल्हाधिकारी सदर्हू कायद्याचे कलम-३, पोट-कलम (ग) अन्वये उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांना पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची—एक
### भूमिचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-४७-२०२०-२१, गावाचे नाव पांगराबंदी, तालुका मालेगांव, जिल्हा वाशिम

| अ. क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | संपादित अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३३ | ० ०३ |
| | एकूण . . | ० ०३ |

**संपादनाचे प्रयोजनः—**मौजे पांगराबंदी येथील जमीन पांगराबंदी बृ. ल. पा. यो. चे पोहोच रत्याचे कामाकरिता .

अ.-एक-२ (१६७३).

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | पांगराबंदी बृ.ल.पा.यो. योजना. |
| प्रकल्पाच्या कामाचा तपशील | :— | मौजा पांगराबंदी येथील जमीन पांगराबंदी बृ.ल.पा.यो. चे रस्त्याच्या कामाकरीता. |
| सामाजिक फायदे | :— | पिण्याचे पाण्याची पातळी वाढते, गुरा ढोरांना पिण्याचे पाण्याची सोय होते. जाण्यायेण्याकरीता रस्ता तयार होतो. |

**अनुसूची—तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे**

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

**अनुसूची—चार**

| | | |
|---|---|---|
| (सामाजिक परिणामाचे निर्धारण करणा-या यंत्रणेने दिल्याप्रमाणे) सामाजिक परिणाम निर्धारणाचा गोषवारा. | :— | महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतूदी लागू करण्यापासून सूट प्राप्त बाबतचे प्रमाणपत्र प्राप्त सबब माहिती निरंक. |

**अनुसूची—पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती**

| | | |
|---|---|---|
| (१) | ज्या अधिका-याची प्रशासन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम | :— आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक. |
| (२) | प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता | :— निरंक |
| (३) | प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसूचनेनूसार झाली आहे त्याचा तपशील. | :— निरंक. |

**टीप.—**उक्त जमिनीचा/जमिनीच्या योजनेचे (Plan चे) निरीक्षण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक १८ जुलै २०२२.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१८.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उ.वि.अ. तथा भू. सं.-अ.का.-कावि-५८०-२०२२.—

ज्याअर्थी, भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम-३ मधील पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने, महसूल व वन विभाग अधिसूचना क्रमांक MIS-11-2014-C.R.-77-A-2, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा केला आहे) द्वारे भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे याला "सदरहू अधिसूचना" संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करताना (सदरहू कायद्याच्या कलम ३ मधील पोट-कलम (ए झेड) नुसार) जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांना या कायद्याअंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, या अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषीत करण्यात आले आहे. त्याअर्थी, अनुसूची–एक मध्ये दर्शविलेल्या जमिनी (यापुढे त्यांचा उल्लेख "उक्त भूमि" असा करण्यात येईल) अनुसूची–दोन मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी, वाशिम यांची समुचित शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदरहू कायद्याच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसूचीत करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर्हू भूमि संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमि संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची–तीन मध्ये नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी, भूमि संपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमि संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची–चार मध्ये नमूद केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, या भूमि संपादन कायद्याचे कलम ४३, पोट-कलम (१) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसूची–पाच मध्ये प्रशासकाचे विवरण नमूद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास, अनुसूची–पाच मध्ये माहिती देणे आवश्यक आहे) ;

त्याअर्थी, आता, सदर्हू कायद्याच्य कलम-११ चे पोट-कलम (४) नुसार अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सदर्हू भूमि कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या भूमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणीमधून अशा भूमी मालकास सूट देऊ शकेल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिका-याद्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदर्हू भूमी संपादन कायद्याचे कलम-११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त नियम " असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उप-नियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्ययावत करण्याचे कामी हाती घेतील.

आणि म्हणून, त्याअर्थी, समुचित शासन म्हणून जिल्हाधिकारी सदर्हू कायद्याचे कलम-३, पोट-कलम (ग) अन्वये उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची—एक
## भूमिचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक २५-४७-२०१८-१९, गावाचे नाव पंचाळा, तालुका वाशिम, जिल्हा वाशिम

| अ. क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | संपादित अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १३३ | ० ०४ |
| २ | १५२ | ० ३३ |
| | एकूण . . | ० ३७ |

**संपादनाचे प्रयोजनः—**मौजे पंचाळा येथील जमीन पंचाळा संग्राहक ल.पा.यो. चे बुडित क्षेत्राच्या कामाकरिता.

## अनुसूची—दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | पंचाळा संग्राहक ल.पा. योजना. |
| प्रकल्पाच्या कामाचा तपशील | :— | मौजे पंचाळा येथील जमीन पंचाळा संग्राहक ल.पा. यो. चे बुडीत क्षेत्राच्या कामाकरिता. |
| सामाजिक फायदे | :— | पिण्याचे पाण्याची पातळी वाढते, गुरा ढोरांना पिण्याचे पाण्याची सोय होते. सिंचन क्षमता वाढते. |

## अनुसूची—तीन
## बाधित व्यक्तींचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

**अनुसूची—चार**

| | |
|---|---|
| (सामाजिक परिणामाचे निर्धारण करणा-या यंत्रणेने दिल्याप्रमाणे) सामाजिक परिणाम निर्धारणाचा गोषवारा. | :— महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतूदी लागू करण्यापासून सूट प्राप्त बाबतचे प्रमाणपत्र प्राप्त. |

**अनुसूची—पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती**

| | | |
|---|---|---|
| (१) | ज्या अधिका-याची प्रशासन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम | :— आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक. |
| (२) | प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता | :— निरंक |
| (३) | प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसूचनेनूसार झाली आहे त्याचा तपशील. | :— निरंक. |

**टीप.—**उक्त जमिनीचा/जमिनीच्या योजनेचे (Plan चे) निरीक्षण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयात करता येईल.

**प्रकाश राऊत,**
उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,
वाशिम.

वाशिम :
दिनांक १९ ऑगस्ट २०२२.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५१९.

**आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कार्या. ६(२)-सूतगि-अम.कॉ.ग्रो.-नों. र.आ-३७१४-२०२२.—

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रमांक सीएसएल-१४९३-११६२-सीआर ४७-१५ सी, दिनांक ७ ऑगस्ट, १९९३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, शीतल तेली-उगले, आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नागपूर याद्वारे,

१. अमरावती कॉटन ग्रोअर्स को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स लि., अमरावती या सुतगिरणीची महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६० चे कलम १०९(२) च्या तरतुदीनूसार परीसमापनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे असे समजून परिसमापनाची कार्यवाही समाप्त करण्याचे आदेश देत आहे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार याद्वारे, अमरावती कॉटन ग्रोअर्स को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स लि., अमरावती या सुतगिरणीची नोंदणी रद्द करीत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१ च्या तरतुदीनुसार अमरावती कॉटन ग्रोअर्स को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स लि., अमरावती या सुतगिरणीचे या आदेशाचे तारखेपासून विसर्जन झाले असे समजण्यात येवून ही सूतगिरणी निगमनिकाय सुतगिरणी असण्याचे बंद होईल.

या आदेशान्वये असेही निर्देशित करीत आहे की, सुतगिरणीचे अवसायकानी सादर केलेले विवरण पत्रकाप्रमाणे सर्व मालमत्ता चिजवस्तू, कारवाई योग्य व सुतगिरणीच्या कामकाजासंबंधित असलेला सर्व रेकॉर्ड पुस्तके, अभिलेख व इतर दस्तावेज पुढील आदेश होईपर्यंत निबंधकाच्या वतीने उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे अभिरक्षेत व नियंत्रणाखाली ठेवतील.

तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम ८९(१७) चे प्राप्त अधिकारानुसार, उपरोक्त नमूद नोंदणी रद्द करण्यात आलेल्या सूतगिरणीच्या निरनिराळ्या न्यायालयात चालू असलेले न्यायालयीन प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत सर्व कामकाज पाहणे करीता, तसेच सर्व मालमत्ता चीज वस्तू, कार्यवाही योग्य दावे, सर्व रेकॉर्ड अभिलेख, इतर दस्तऐवज, बँक खात्यातील शिल्लक राहिलेली रक्कम वा सूतगिरणीच्या अन्य कोणत्याही

मालमत्तेतून प्राप्त रक्कम निहीत (vest) झाल्याचे आदेशीत करून (सदर रकमा बँकेकडून/ अन्य स्त्रोत्राद्वारे प्राप्त करून घेवून) आयुक्त वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था यांचे अतिरिक्त निधीखाती वर्ग करण्यासाठी निबंधकाच्या वतीने श्री. राजेंद्र भुयार, उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांची अभिरक्षक (Custodian) म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश आज दिनांक ०५ जुलै, २०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**शीतल तेली-उगले** (भा. प्र. से.),
आयुक्त,
वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

नागपूर :
दिनांक ५ जुलै २०२२.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५२०.

BY COMMISSIONER OF TEXTITLES & ADDITIONAL REGISTRAR,
CO-OPERATIVE SOCIETIES

*Notification*

No. SPM-D---Regn-5019-2022.-----

Commissioner of Textile and Additional Registrar, Co-operative Societies, State of Maharashtra, Nagpur, here by registered Nirmal Magasvargiya Sahakari Sootgirni Ltd., Anjangaon Surji, Taluka Anjangaon Surji, District Amravati under Section 9 (*1*) of the Maharashtra Co-Operative Societies Act, 1960 (Maharashtra Act, No. XXIV of 1961). The Registration Number of the Society is No. ATI-PRG-(A)-CT-09, dated 10th August, 2022, and the same has been classified as "Processing Society" Sub Class "Agricultural Processing Society" under Section 12(*1*) of the said Act, read with Rule 10(*1*) of the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961.

SHEETAL TELI-UGALE (IAS),
Commissioner of Textiles &
Additional Registrar, Co-operative Societies,
Maharashtra State,
Nagpur.

Nagpur :
Dated the 10th August 2022.

अ.-एक-३ (१६७३).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.